'विवेकानंद'मध्ये वन्यजीव सप्ताह उत्साहात

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभागातर्फे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहामध्ये रांगोळी, फोटोग्राफी, भित्तीपत्रके, क्राफ्ट मॉडेल, भित्तीपत्रके निबंध, वक्तृत्वा अशा विविध स्पर्धांचा समावेश होता. उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. श्रुती जोशी यांची उपस्थिती होती. बी.एस्सी.च्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. सप्ताहाच्या सांगताप्रसंगी 'वन्यजीव संवर्धन व कायदे' या विषयावर वन विभागाचे निवृत्त अधिकारी डी. बी. शेंडगे यांचे व्याख्यान झाले. स्पर्धांमध्ये प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. प्राचार्य डॉ. कुंभार आणि विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के, डॉ. टी. सी. गौपाले यांचे मार्गदर्शन लाभले.